Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date 10 February 2025
Time 11.00 to 11.05 AM
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १० फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी थोड्याच वेळात आठव्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. दिल्लीत भारत मंडपम इथं हा कार्यक्रम होणार असून, या कार्यक्रमाचं थेट प्रसारण दूरदर्शन, आकाशवाणी तसंच सर्व वृत्त वाहिन्यांवरून होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईतून या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

****

दरम्यान, पंतप्रधान आज दुपारी फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर रवाना होणार आहेत. फ्रान्सच्या दौऱ्यात ते उद्या होणाऱ्या कृत्रिम प्रज्ञा कृती परिषदेत सहअध्यक्ष म्हणून सहभागी होतील. कृत्रिम प्रज्ञेच्या वापरासाठी नैतिक आणि जबाबदार मार्गदर्शक सूचना तयार करणं यावर परिषदेत भर दिला जाणार आहे. मार्सेली इथल्या नवीन भारतीय वकीलातीचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान फ्रान्सच्या दौऱ्यात अनेक द्विपक्षीय बैठका, व्यावयासिकांसोबतच्या चर्चांमध्ये सहभागी होणार असून आंतरराष्ट्रीय थर्मोन्यूक्लीअर एक्सपरिमेन्टल रिऍक्टर या संस्थेला भेट देणार आहेत.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला भेट देणार आहेत. प्रयागराज विमानतळावर त्यांचं उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी स्वागत केलं. राष्ट्रपती त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान करणार असून, अक्षयावत आणि बडे हनुमान मंदीरालाही भेट देणार आहेत. डिजिटल महाकुंभ केंद्रातून त्या कुंभमेळ्याची पाहणी देखील करणार आहेत.

दरम्यान, आतापर्यंत ४३ कोटींपेक्षा जास्त भाविकांनी महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर स्नान केलं आहे. मकर संक्रांत, मौनी अमावस्या आणि वसंत पंचमीचं अमृत स्नान झाल्यानंतर अजूनही भाविकांचा महाकुंभला भेट देण्याचा उत्साह कायम आहे. येत्या २६ तारखेपर्यंत प्रयागराज इथं हा महाकुंभ उत्सव सुरू राहील.

****

रेल्वे विभागात नव्यानं ९५ हजार पदांची भरती करण्यात येईल, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल बिहारमधील बेतिहा इथं सांगितलं. नुकत्याच झालेल्या दिड लाख भरतीप्रक्रियेव्यतिरिक्त या जागांची भरती होईल असंही त्यानी स्पष्ट केलं. नमो आणि वंदे भारत रेल्वेला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन या रेल्वेगाड्यांचं उत्पादन वाढवण्याचा सरकारचा विचार असल्याचं, वैष्णव यांनी सांगितलं.

****

यावर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात सातत्य आणि सर्वसमावेशकता असून, या अर्थसंकल्पामुळे एक कोटी मध्यमवर्गीय कुटुंब करमुक्त झाले असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. 'एडवांटेज विदर्भ' या तीन दिवसीय औद्योगिक परिषदेच्या समारोप प्रसंगी नागपुरात आले असता ते काल वार्ताहरांशी बोलत होते. देशात शंभर इंडस्ट्रियल हब सुद्धा बनवणार असल्याचं सांगून गोयल यांनी, शेतकरी, पर्यटन त्याचप्रमाणे इतर उद्योगात या अर्थसंकल्पात असलेल्या ठळक बाबींविषयी देखील यावेळी माहिती दिली

****

पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे. नाशिक इथं सुरु असलेल्या जागतिक कृषी महोत्सवामध्ये 'पर्यावरण' या विषयावरच्या परिसंवादात त्या काल बोलत होत्या. शेतीत विविध उपक्रम राबवण्याऱ्या शेतकऱ्यांसह पर्यावरण पूरक केंद्र म्हणून जळगाव जिल्ह्यातल्या आनंद नगर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

****

शेतकरी आणि प्रवाशांच्या सुविधेसाठी देवळाली ते दानापूर या 'शेतकरी समृद्धी विशेष रेल्वे'चा कालावधी वाढवण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. शेतमाल पोहोचवण्यासाठी मिळालेला प्रतिसाद पाहता, हा निर्णय घेण्यात आला आहे. या गाडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा नाशवंत माल वेगाने बाजारपेठेपर्यंत पोहोचवणं शक्य होत असल्याने या गाडीला चांगला प्रतिसाद मिळाला आहे

****

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ च्या निमित्ताने वर्धा इथं काल सहकार राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांच्या उपस्थितीत सहकार मेळावा घेण्यात आला. राज्य सहकारी बँकेच्या सहकार्याने जिल्हा बँकेचं आर्थिक सक्षमीकरण करण्यासोबतच जिल्ह्यातल्या सहकार क्षेत्राला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

****

गोंदिया जिल्ह्यात देवरी तालुक्यातल्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाचं उद्घाटन काल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भुषण गवई यांच्या हस्ते झालं. या इमारतीतून सर्वसामान्य लोकांना न्याय मिळेल अशी अपेक्षा गवई यांनी व्यक्त केली. देवरी तालुका हा आदिवासीबहुल म्हणून ओळखला जात असून, या ठिकाणी अतिरिक्त जिल्हा न्यायालय तयार करण्यात यावं अशी मागणी तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत सांगडीवर यांनी यावेळी केली.

नांदेड जिल्ह्यात भोकर इथं अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाच्या नवीन विस्तारीत इमारतीचं उद्घाटन काल मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा नांदेड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते झालं.

****

नांदेड जिल्ह्यात आजपासून हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबवण्यात येत आहे. नायगाव तालुक्यातल्या घुंगराळा जिल्हा परिषद शाळेत या मोहीमचं जिल्हास्तरीय उद्घाटन खासदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या मोहिमेअंतर्गत आरोग्य कर्मचारी बूथवर आणि घरोघरी भेट देऊन वयोगटानुसार डीईसी आणि अल्बेंडाझॉल ही औषधं देणार आहेत.

****